Vol 2 Issue 10 July 2013

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

*Review Of Research*
Vol.2, Issue. 10, July. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.reviewofresearch.net

**ORIGINAL ARTICLE**

# *स्वामी रामानंद तीर्थ यांचे कार्य*

***प्रा.तळणीकर एस. जी.***

सहा.प्राध्यापक व विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग,तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव .

***सारांश :***

निजामाच्या हैद्राबाद संस्थानातील जनतेचे मुक्तीदाते म्हणून स्वामी रामानंद तीर्थ महाराष्ट्राला ज्ञात आहेत. स्वामीजींच्या कार्याचे मोजमाप करणे अवघड आहे. परंतू त्यांच्या जीवनकार्याची काही वैशिष्टे लक्षात घेतली तर आजच्या सामाजिक व राजकीय परिस्थीतीच्या संदर्भात स्वामीजींचे कार्य उपयुक्त ठरू शकते असे आपल्या सहज लक्षात येते, स्वामीजींचे पूर्ण नांव व्यंकटेश भगवानराव खेडगीकर त्यांचा जन्म 3 आक्टोंबर 1903 रोजी सिंदगी जिल्हा विजापूर कर्नाटक येथे झाला. सिंदगी–गाणगापूरच्या प्राथमिक शिक्षणानंतर ते पूढील शिक्षणासाठी सोलापूरच्या सरकारी नॉर्थकोट हायस्कूलमध्ये दाखल झाले. सोलापूरला लोकमान्य टिळकांच्या भाषणांनी व महात्मा गांधीजींच्या दर्शनाने त्यांना देशसेवेची आणि स्वातंत्र्य लढयाची प्रेरणा मिळाली.

***प्रस्तावना :–***

01 ऑगस्ट 1920 रोजी झालेल्या टिळकांच्या मृत्यूंचे त्यांना अपार दु:ख झाले. त्याच दिवशी त्यांनी आजन्म अविवाहित राहून देशसेवा करण्याची शपथ घेतली. सोलापूर रेल्वेस्टेशन वर घडून आलेल्या गांधीजींच्या दर्शनाने आणि आशिर्वादाने ते भारावून गेले. मॅट्रीकची परीक्षा जवळ आलेली असतांना देखील त्यांनी सरकारी शाळेवर बहिस्कार टाकून शिक्षण सोडले आणि जाणीवपूर्वक राष्ट्रीय शैक्षणिक संस्थेमधूनच शिक्षण पूर्ण करण्याचा निर्धार केला. 1921 साली पुण्याच्या राष्ट्रीय विद्यापीठाची मॅट्रीकची परीक्षा पास झाल्यावर त्यांनी उच्च शिक्षणासाठी अमळणेरच्या राष्ट्रीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. इंटर नंतर ते पुण्याला गेले आणि टिळक राष्ट्रीय विद्यापीठाची पदवी परीक्षा प्रथम श्रेणीत सर्वप्रथम येवून प्राप्त केली. पदव्युत्तर परीक्षा 'लोकशाहीचा विकास' या राज्यशास्त्रीय विषयावर प्रबंध लिहून उत्तीर्ण झाले.

सन 1926 ला मुंबईच्या कामगार–संघटन क्षेत्रात प्रवेश करून स्वामीजी तत्कालीन प्रसिध्द कामगार नेते ना. म. जोशी यांचे स्वीय सहाय्यक बनले. या कार्यासाठी त्यांना दिल्लीला जावून रहावे लागले. त्यांची वयाची पंचवीश वर्षे देखील पूर्ण झालेली नव्हती याच काळात त्यांना अर्धांग वायूच्या आजाराने ग्रासले. उपचारासाठी त्यांना जवळ जवळ अठरा महिने विविध रूग्णालयात उपचार घ्यावा लागला. या जीवघेण्या आजारातून ते सावरले. तेव्हाच हिप्परग्याचे देशमुख बंधु त्यांच्या भेटीला आले. त्यांनी स्वामीजींना इंग्रजी शिकविण्यासाठी आपल्या राष्ट्रीय विद्यालयात नेले अशा रितीने स्वामीजींचा 1929 साली हैद्राबाद संस्थानात प्रवेश झाला. संपूर्ण गुलामगिरीत जखडलेल्या तेव्हांच्या भारतातील हैद्राबाद हे सर्वात मोठे संस्थान या संस्थानात मराठी भाषिक मराठवाडयांचे तेव्हाचे पाच जिल्हे, तेलगू भाषिक तेलंगाणाचे आठ जिल्हे, आणि कन्नड भाषिक कर्नाटकचे तीन असे एकूण सोळा जिल्हे एक कोटी चौसष्ट लाख लोकवस्ती, सव्वादोनशे वर्षापासून वंशपरंपरागत पध्दतीने चालत आलेली आसपुशाही घराण्याची सात पिढयांची अनिर्बंध सरंजामशाही, हुकूमशाही, राजसत्ता, सातवा निझाम मीर उस्मान अलीखॉं हा तेव्हा हैद्राबाद संस्थानचा राजा होता.

सदरील कालावधीत उर्वरीत भारतात ब्रिटीशांच्या विरोधात महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली परकीय इंग्रजी

सत्तेच्या विरूध्द प्रखर आंदोलन चालू झाले होते. या आंदोलनाचा शिरकाव आपल्या राज्यात होवू नये यांची काळजी धूर्त निझाम घेत होता. जनतेला कुठल्याच प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते जनता गुलामगिरीत खितपत पडली होती. अशा परिस्थितीत हिपरग्याच्या शाळेत केवळ पोटाला भाकर आणि अंगाला कापड यावरच उच्च विभूषीत तरूण स्वामीजी यांनी शिक्षकी पेशा अंगिकारला होता. याच काळात उत्तरेतील स्वामी रामतीर्थ संप्रदायाकडे ते आकृष्ट झाले. रामतीर्थांनंतर सर्वाधिकारी बनलेल्या नारायण स्वामींशी त्यांनी संपर्क साधला 14 जानेवारी 1952 रोजी नारायण स्वामी स्वतः हिपरग्याला उपस्थित झाले त्यांनी स्वामींजींना विधीपूर्वक सन्यास दिक्षा दिली. तेव्हापासून ते स्वामी रामानंद तीर्थ बनले.

हिपरग्याच्या शाळेत शिक्षक म्हणून कार्य करतांना त्यांना विद्यार्थ्यांचे अलोट उत्कट प्रेम मिळाले तसेच विद्यार्थ्यांच्या पालका सोबत देखील जीवाभावाचे संबंध निर्माण झाले. सन 1935 साली स्वामीजींनी आपल्या अनेक सहकारी शिक्षकासह हिपरग्याची शाळा सोडली आणि आंबाजोगाई येथे आले. योगेश्वरी नूतन माध्यमिक विद्यालयाची स्थापना करून त्यांनी प्रयत्नपूर्वक त्याला सरकारी मान्यता मिळवली. हैद्राबाद मुक्तीसंग्राम गतीमान करण्यासाठी युवकांचा सहभाग त्यांना इथेच प्राप्त झाला.

निझामाच्या राज्यात कॉंग्रेस हा शब्द देखील उच्चारता येत नव्हता. तेव्हा तिन्ही भागातील लोकांनी सांस्कृतीक कार्याचा बहाणा करीत महाराष्ट्र परिषद, आंध्र परिषद आणि कर्नाटक परिषद अशा निरनिराळया प्रादेशिक संघटना निर्माण केल्या, मराठवाडयात महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन सन 1936 साली परतूर येथे झाले. स्वामीजी आणि त्यांच्या शिक्षक सहकाऱ्यांनी या अधिवेशनात सक्रिय सहभाग घेतला. सन 1938 साली महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन लातूरला झाले. सर्वांच्या आग्रहाखातर स्वामीजींनी शाळोचे मुख्यध्यापक पद सोडून महाराष्ट्र परिषदेचे सरचिटणीसपद स्विकारले. या कार्यासाठी स्वामीजी आंबेजोगाई येथून थेट हैद्राबादला गेले.

हैद्राबादला असतांना स्वामीजींनी सर्व परिसर पिंजून काढला तिन्ही भाषिक लोकांच्या भेटीगाठी घेवून विचार विनिमय केला. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी विरूध्द सत्याग्रह पुकारला. त्यांना अटक झाली. निझाम सरकारने अनेकांना तुरूंगात टाकले. महात्मा गांधीजींच्या सल्याने कॉंग्रेसने सत्याग्रह आंदोलन मागे घेतले. सन 1938 साली स्वातंत्र्यासाठी प्रखर संघर्षाला सुरूवात झाली. सन 1940 साली महात्मा गांधीजींकडून सत्याग्रहाला पुन्हा परवानगी मिळाली. गांधीजींनी सत्याग्रही म्हणून स्वामीजींची निवड केली. स्वामींजींना निझाम सरकारने दुसऱ्यांदा तुरूंगात टाकले. सन 1942 च्या चले जाव आंदोलनात देखील स्वामीजींनी सक्रीय सहभाग नोंदविला. सन 1946 च्या जूलै महिण्यात हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस वरील बंदी निझाम सरकारने मागे घेतली. स्वातंत्र्य आदोलन गतिमान झाले. दिनांक 16,17,18 जून 1947 ला हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे पहिले विराट अधिवेशन स्वामीजींच्या अध्यक्षतेखाली झाले. आपल्या धारदार भाषणातून स्वामीजींनी स्वतंत्र भारतीय संघराज्यात निझामाने बिनशर्त सामील होण्याचे आव्हान केले आणि जनतेला त्यासाठी प्राणपणाने लढण्याचे आवाहन केले.

दिनांक 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत इंग्रजाकडून स्वतंत्र झाला. परंतू निझाम भारतात सामील होत नव्हता तो वेगळया हैद्राबाद राजसत्तेची स्वप्ने पाहू लागला. स्वामीजींना त्यांनी तुरूंगात टाकले. निझामाची रजाकार संघटना जनतेवर अत्याचार करत होती. अनेकांना त्यांनी तुरूगांत टाकले शेवटी भारत सरकारला हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात सामील करवून घेण्यासाठी पोलीस ॲक्शन घ्यावी लागली दि. 13 सप्टेंबर 1948 ला भारतीय सैन्य हैद्राबाद संस्थानात घूसले. दि. 17 सप्टेंबर 1948 रोजी निझामाने शरणागती पत्कारली. हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले व स्वामीजी विजयी झाले.

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर तेलंगणा भागात हिंसाचार उसळला कम्युनिस्टांचे उग्र भूमी आंदोलन सुरू झाले. सन 1951 मध्ये भूदान यज्ञ स्वामीजींनी विनोबांच्या सोबत सुरू केला. स्वामीजी विनोबांची साथ देत शेवटपर्यंत आंदोलणात सक्रीय राहिले. स्वतंत्र झाल्यावर हैद्राबादचा कुळ कायदा पास करवून घेण्यात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली.

सन 1952 मध्ये गुलबर्गा तर 1956 मध्ये औरंगाबाद लोकसभा मतदार संघातून स्वामीजी कॉंग्रेस पक्षाचे खासदार म्हणून निवडून आले. आपल्या विचारांची व इंग्रजी भाषणांची चांगली छाप त्यांनी लोकसभेत पाडली स्वामीजींनी भाषावर प्रांत रचनेचा नेहरूंच्या रागलोभाची पर्वा न करता पुरस्कार केला. स्वामीजींचा मुळ पिंड शिक्षकाचा होता त्यामुळे शेवटपर्यंत ते शिक्षण क्षेत्रांकडे लक्ष देत राहिले. पिपल्स कॉलेज, नांदेड 1950, योगेश्वरी महाविद्यालय, आंबेजोगाई 1956, पुरणमल टेक्निकल कॉलेज लातूर 1955 या शिक्षण संस्था त्यांनी जनतेच्या सहयोगातून काढल्या. सन 1958 साली औरंगाबाद येथे मराठवाडयाचे पहिले विद्यापीठ स्थापन करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. हैद्राबाद खादी समिती, मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीची निर्मिती त्यांनीच केली. राजकारण सोडल्यानंतर स्वामीजीं अध्यात्मिक साधणेसाठी आध्रच्या पुर्व गोदावरी जिल्हयातील शांती आश्रमात गेले तेथेच त्यांची तब्यत बिघडली, हैद्राबादला आणून त्यांना इस्पितळात दाखल करण्यात आले. इ.सन 1962 रोजी दुपारी साडेतीन वाजता त्यांची प्राणज्योत मालवली व एक तेजस्वी पर्व संपले.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com